## भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी

**प्रस्तावना**

**विषय:-** प्रारूप सुधारित विकास योजना भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका जि. ठाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (३) अन्वये नियोजन समितीस मुदतवाढ देणेबाबत ...

**संदर्भ:-** सर्व नियोजन समिती सदस्य यांचा दि. २८/१०/२०२४ रोजीचा विनंती अर्ज.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम २६(१) मधील तरतूदीनुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीची प्रारुप विकास योजना तयार करुन त्यासंबधीची सूचना उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये दिनांक १२/१०/२०२३ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द केली आहे.

उपरोक्त सूचनेच्या अनुषंगाने प्राप्त हरकती/सूचना धारकांना सुनावणी देण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम २८(२) अन्वये सूचना क्र. तांत्रिक/संसनर/वियोविघ/भिनिश मनपा/३६४, दि. २४/०१/२०२४ अन्वये गठीत झालेली आहे.

उक्त अधिनियमाचे कलम २८(३) अन्वये नियोजन समितीची नियोजन प्राधिकरणास प्राप्त हरकती/सूचनांवर सुनावणी देऊन अहवाल सादर करण्याची मूळ मुदत लोकसभा निवडणुक, २०२४ व महाराष्ट्र विधान परिषदेसाठी ०२ पदवीधर आणि ०२ शिक्षक मतदार संघाची निवडणुक आचारसंहीतेचा कालावधी वगळता दि. १२/०७/२०२४ पावेतो होती.

उक्त नियोजन समितीने प्रसिद्ध प्रारूप विकास योजनेवर प्राप्त हरकत/ सुचनांची संख्या विचारात घेऊन त्यांचेकडील दि.१२/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाच्या कलम २८(३) मधील तरतुदीनुसार प्राप्त हरकती/सूचनांचा सुनावणी अहवाल सादर करण्यासाठी २ महिन्याची मुदतवाढ पत्रात नमूद कारणास्तव मंजूर होण्यास विनंती केली, त्यास मा. प्रशासकिय ठराव क्र.४५५ दि.१६/०७/२०२४ अन्वये मंजुरी देऊन व भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा आदेश क्र.तांत्रिक/ससंनर/वियोविघ/भिनिश मनपा/२५२११/२०२४, दि. १६/०७/२०२४ अन्वये दि. १२/०७/२०२४ ते दि. १२/०९/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तदनंतर उक्त नियोजन समितीने त्यांचेकडील दि. १२/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाच्या कलम २८(३) मधील तरतुदीनुसार प्राप्त हरकती/सूचनांचा सुनावणी अहवाल सादर करण्यासाठी दि. १३/०९/२०२४ ते दि.१२/१०/२०२४ पर्यंतची १ महिन्याची मुदतवाढ मंजूर होण्यास विनंती केली, त्यास प्रशासकीय ठराव क्र. ५५५ दिनांक १३/०९/२०२४ अन्वये मंजुरी देऊन व भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा आदेश क्र. तांत्रिक/ससंनर/वियोविघ/भिनिश मनपा/२५२७६/२०२४, दि. १३/०९/२०२४ अन्वये दि. १३/०९/२०२४ ते दि. ३०/०९/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तदनंतर उक्त नियोजन समितीने त्यांचेकडील दि. २५/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाच्या कलम २८(३) मधील तरतुदीनुसार प्राप्त हरकती/सूचनांचा सुनावणी अहवाल सादर करण्यासाठी दि. ०१/१०/२०२४ ते दि.०७/१०/२०२४ पर्यंतची मुदतवाढ मंजूर होण्यास विनंती केली, त्यास प्रशासकीय ठराव क्र. ५८७ दिनांक २६/०९/२०२४ अन्वये मंजुरी देऊन व भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा आदेश जा. क्र. तांत्रिक/ ससंनर/ वियोविघ/भिनिश मनपा/२५२८४/२०२४, दि. २७/०९/२०२४ अन्वये दि. ०१/१०/२०२४ ते दि. ०७/१०/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

आता उक्त नियोजन समिती सदस्यांनी पत्रात नमुद कारणास्तव त्यांचेकडील दिनांक २८/१०/२०२४ च्या पत्रान्वये अपेक्षिल्यानुसार दि. ०८/१०/२०२४ ते दि.३१/०१/२०२५ पर्यंतची मुदतवाढ मंजूर होण्यास विनंती केली असुन सदर समितीस अधिनियमाच्या कलम २८(३) मधील तरतुदीनुसार प्राप्त हरकती/सूचनांचा सुनावणी अहवाल सादर करण्यासाठी मुदतवाढ देणे आवश्यक असल्याचे दिसून येत आहे.

सद्या मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नाहीत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक या नात्याने आयुक्त, भि.नि.श.म.न.पा. पाहत आहेत. विषयांकित नमुद कलम २८ (३) अन्वये प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**प्रशासकिय ठराव क्र.** ७१८                                                  दि.१४/०१/२०२५

१. नियोजन समितीने पत्रात नमूद केलेली कारणमिमांसा व त्यावर विभागाकडुन प्रस्तावित करण्यात आल्यानुसार भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या प्रारुप सुधारित विकास योजना कार्यवाही अनुषंगाने गठित करण्यात आलेल्या नियोजन समितीला मुदतवाढ मंजुर करणे आवश्यक असल्याने उक्त नियोजन समितीला प्राप्त हरकती/सूचनांची सुनावणी घेऊन अहवाल सादर करण्यासाठी, कलम २८(३) अन्वये दि. ०८/१०/२०२४ ते दि.३१/०१/२०२५ पर्यंतची मुदतवाढीस या ठरावाव्दारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२ उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने पुढील प्रशासनिक कार्यवाही करण्यासाठी आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

(अजय विलास वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी नि. श. महानगरपालिका, भिवंडी.